# महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी

# ऑगस्ट महिन्यातील कामांचा तपशील

## ऊस

- आडसाली उसाच्या लागवडीची कामे ३० ऑगस्ट पर्यंत पूर्ण करावीत.
- ऊस लागवडीसाठी दोन सरीमधील अंतर मध्यम जमिनीत १०० सें.मी. व भारी जमिनीत १२० सें.मी. ठेवावे. पट्टा पध्दतीसाठी मध्यम जमिनीत ९०-१५० सें.मी. व भारी जमिनीत ९०-१८० सें.मी. पट्टा पध्दतीचा अवलंब करावा.
- रोगग्रस्त किडग्रस्त शेतातील व खोडव्याचे बेणे लागणीस वापरू नये. ऊस बेणे मळ्यातीलच चांगले ऊस बेणे निवडून लागणीसाठी वापरावे.
- आडसाली लागण करताना को ८६०३२, फुले ०२६५, फुले ऊस १५०१२ आणि व्हीएसआय ०८००५ यापैकी कोणत्याही शिफारशीत वाणांचा जमिनीच्या मगदुरानुसार वापर करावा.
- ऊस बेणे लागण करण्यापूर्वी १० ग्रॅम कार्बेन्डॅझिम प्रति १० लिटर पाण्यात मिसळून त्यामध्ये १० मिनिटे बुडवावे आणि तेच बेणे परत १ किलो ॲसेटोबॅक्टर आणि १२५ ग्रॅम स्फुरद विरघळविणारे जिवाणू प्रति १०० लिटर पाण्यात मिसळून तयार केलेल्या द्रावणात ३० मिनिटे बुडवून ठेवावे व नंतर लागणीसाठी वापरावे, त्यामुळे नत्राच्या मात्रेत ५०% व स्फुरदाच्या मात्रेत २५% इतकी बचत होते.
- वाळवी किडीच्या नियंत्रणासाठी क्लोथीआनिडीन ५०% डब्ल्यू.डी. जी. हेक्टरी २.५ ग्रॅम प्रति १० लिटर
- पाण्यात मिसळून फवारणी पंपाची तोटी (नोझल) काढून सरीतून सोडावे व मुळ पोखरणारी अळीच्या बंदोबस्तासाठी फिप्रोनिल ०.३% दाणेदार प्रति हेक्टरी २५ किलो सरीमध्ये चळीतून द्यावे.
- ऊस लागणीकरीता उसाच्या एक डोळा अथवा दोन डोळा टिपरीचा वापर करावा.
- उसावरील तपकिरी ठिपके आणि पोक्का बोईंग या बुरशीजन्य रोगाच्या नियंत्रणासाठी रोगाचा प्रादुर्भाव दिसून आल्यानंतर ३० ग्रॅम मॅन्कोझेब १० लिटर पाण्यात किंवा कार्बेन्डॅझीम १० ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यात मिसळून या बुरशीनाशकाच्या ३ फवारण्या १२ दिवसांच्या अंतराने कराव्यात. तांबेरा रोगाच्या नियंत्रणासाठी रोगाचा प्रादुर्भाव दिसून आल्यानंतर ०.३ % मॅन्कोझेब ३० ग्रॅम प्रति १० लिटर पाणी किंवा टेब्युकोनॅझोल ०.१% १० मिली + ॲझोऑक्सीस्ट्रॉबीन १८.२% + डायफेनकोन्याझोल ११.४% एस.सी. ०.१% १० मिली प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारावे.
- हुमणी किडीचा बंदोबस्त करण्यासाठी, हुमणीग्रस्त ऊस पिकांची रोपे उपटावीत. जमिनीत मुळाशेजारी मिळालेल्या अळ्या गोळा करून रॉकेल मिश्रीत पाण्यात टाकून माराव्यात. रासायनिक नियंत्रणासाठी फिप्रोनिल ४०% + इमिडाक्लोप्रीड ४०% दाणेदार हेक्टरी ४ ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी पंपाची तोटी (नोझल) काढून सरीतून सोडावे अथवा थायमिथोक्झाम ०.९०% + फिप्रोनिल ०.२०% जी.आर. हेक्टरी १५ किलो सरीमध्ये चळीतून द्यावे.
- आडसाली ऊसाची लागण केल्यानंतर जमिनीत वापसा आल्यानंतर (साधारण ३-४ दिवसांनी) ऊसातील तणांच्या बंदोबस्तासाठी ५० ग्रॅम ॲट्राझिन किंवा १५ ग्रॅम मेट्रीब्युझीन १० लिटर पाण्यात मिसळून संपूर्ण क्षेत्रावर फवारणी करावी.
- आडसाली ऊसाला लागवडीचे वेळी शिफारशीतील मात्रेच्या १० टक्के नत्र, ५० टक्के स्फुरद, ५० टक्के पालाशयुक्त खताची मात्रा द्यावी. ऊसासाठी नत्रयुक्त खतासाठी निमकोटेड युरियाचा वापर करावा.
- ऊसाला खते देताना को ८६०३२ या जातीसाठी हेक्टरी ५००:२००:२०० किलो नत्र, स्फुरद व पालाश ही खतमात्रा घ्यावी तर कोएम ०२६५ व कोव्हीएसआय ९८०५ या वाणांसाठी हेक्टरी ४००:१७०:१७० किलो नत्र, स्फुरद व पालाश खतमात्रेचा वापर करावा.
- माती परीक्षणाच्या आधारे जमिनीमध्ये सुक्ष्म अन्नद्रव्यांची कमतरता असल्यास प्रति हेक्टरी प्रति हेक्टरी २५ किलो फेरस सल्फेट, २० किलो झिंक सल्फेट, १० किलो मॅंगनीज सल्फेट आणि ५ किलो बोरॅक्स ही सुक्ष्म अन्नद्रव्ययुक्त खते चांगल्या कुजलेल्या शेणखतात १०:१ प्रमाणात मिसळून २ ते ३ दिवस मुरवून सरीमध्ये चळी घेवून मातीआड करावीत.
- स्फुरदयुक्त खतांसाठी सिंगल सुपर फॉस्फेटचा वापर केल्यास गंधक या सुक्ष्म अन्नद्रव्याची वेगळी मात्रा द्यावी लागणार नाही.
- ऊस पिकावर येणाऱ्या पोक्का बोंईग रोगाच्या प्रभावी नियंत्रणासाठी, रोगाचा प्रादुर्भाव दिसून आल्यानंतर ०.३० % मॅंकोझेब या बुरशीनाशकाच्या तीन फवारण्या बारा दिवसांच्या अंतराने घेण्याची शिफारस करण्यात येत आहे.
- ऊसावरील तांबेरा व तपकिरी ठिपके रोगाच्या प्रभावी व्यवस्थापनासाठी ॲझोऑक्सीस्ट्रॉबीन १८.२% + डायफेनकोन्याझोल ११.४% एस.सी. ०.१% (१० मिली प्रति १० लिटर पाणी) या संयुक्त बुरशीनाशकाच्या तीन फवारण्या रोगाच्या प्राथमिक लक्षणे दिसून आल्यानंतर १५ दिवसांच्या अंतराने करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

## बागायती कापूस

- पांढऱ्या माशीचा प्रादुर्भाव समजण्यासाठी व नियंत्रणासाठी पिवळे चिकट सापळे (२५ प्रति हेक्टर) शेतात लावावे.
- रस शोषणाऱ्या किडींचा प्रादुर्भाव आर्थिक नुकसान पातळीपेक्षा जास्त दिसून आल्यास पायरीप्रोक्झीफेन १० ई.सी. २० मिली. किंवा बुप्रोफेझीन २५ मिली. किंवा फ्लोनिकॅमिड ५० डब्ल्यू जी. २ ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारावे.
- पांढऱ्या माशीचा प्रादुर्भाव आर्थिक नुकसान पातळीपेक्षा जास्त असल्यास पायरीप्रोक्झीफेन १० ई.सी. २० मिली प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारावे.
- कामगंध सापळ्यामध्ये सतत २-३ दिवस, ८-१० गुलाबी बोंड अळीचे पतंग दिसून आल्यास प्रोफेनोफॉस ५० ई. सी. प्रमाणे २० मिली किंवा लम्बडा सायहॅलोथ्रीन ५ ई. सी. १० मिली प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.
- बुरशीजन्य करपा रोगाच्या नियंत्रणासाठी पायरीक्लोस्ट्रोबीन २० डब्ल्यू. जी. १० ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी किंवा मेटीराम ५.५% + पायरॅक्लोरोस्टोबीन ५% डब्ल्यू.जी. २० ग्रॅम प्रति १० ली. पाण्यात फवारणी करावी.
- मॅग्नेशिअम सुक्ष्म अन्नद्रव्ये २० ते ३० कि.ग्रॅम प्रति हेक्टरी जमिनीत द्यावे. लाल्या रोगाचा प्रादुर्भाव आढळल्यास २ टक्के डायअमोनियम फॉस्फेट खताचे द्रावण १५ दिवसांच्या अंतराने दोन वेळेस पिकावर फवारावे.
- गुलाबी बोंड अळीग्रस्त डोमकळ्या तोडून आतील अळीसह नष्ट कराव्यात.
- कपाशीच्या शेतात पक्षांना बसण्यासाठी हेक्टरी किमान २५ पक्षीथांबे उभे करावेत, म्हणजे पक्षी त्यावर बसून शेतातील अळ्या टिपून खातील.

## कडधान्य पिके

### मूग आणि उडिद

- फुलकळी लागण्याच्या आणि शेंगा भरण्याच्या अवस्थेत गरजेनुसार शिफारशीत किड व रोग नियंत्रणाचे उपाय करावेत. यासाठी मोनोक्रोटोफॉस ३६ टक्के एस एल ६२५ मि.ली. + पाण्यात मिसळणारे गंधक १२५० ग्रॅम ५०० लिटर पाणी / हेक्टरी मिसळून फवारणी करावी.
- पाऊस नसल्यास संरक्षित पाणी द्यावे. अथवा २ टक्के युरिया किंवा पोटॅशियम नायट्रेटची फवारणी करावी.

### तूर

- किड व रोग नियंत्रणासाठी एकात्मिक किड नियंत्रण पध्दतीचा अवलंब करावा.
- पाऊस नसल्यास पिकास संरक्षित पाणी द्यावे. किंवा फुलअवस्थेत २ टक्के युरियाची फवारणी करावी.

## भात पीक

- **रासायनिक खतांचा वापर** : हळव्या जातींमध्ये उरलेले ५० टक्के नत्र लागणीनंतर २५ ते ३० दिवसांनी द्यावे. निमगरव्या व गरव्या जातींमध्ये लागणीनंतर २५ ते ३० दिवसांनी ४० टक्के नत्र आणि २० टक्के नत्र लागणीनंतर ५५ ते ६० दिवसांनी द्यावे. संकरित जातींकरिता हेक्टरी उरलेले २५ टक्के नत्र लागणीनंतर २५ ते ३० दिवसांनी आणि उर्वरीत २५ टक्के नत्र लागणीनंतर ५५ ते ६० दिवसांनी द्यावे.
- **पाणी व्यवस्थापन** : भात पिकाच्या योग्य वाढीकरीता व अधिक उत्पादनाकरीता भात खाचरात पाण्याची योग्य पातळी राखणे आवश्यक आहे. पिकाच्या वाढीच्या अवस्थेनुसार भात खाचरातील पाण्याची पातळी पुढीलप्रमाणे असावी.
  भात पोटरी अवस्थेत - ५ ते ३० सें.मी.

## नाचणी पीक

- पिकामध्ये नांग्या असल्यास १५ ते २० दिवसांनी नांग्या भरून घ्याव्यात.
- एक कोळपणी २० ते २५ दिवसांनी करावी.
  आंतरमशागत : एक कोळपणी व एक खुरपणी
- एक खुरपणी ४५ ते ६० दिवसांनी करावी.
- पेरणीनंतर ३० दिवसांनी ३० किलो नत्र द्यावे.

## बाजरी

- पिकाची दोन वेळा कोळपणी व गरजेनुसार १ ते २ वेळा खुरपणी करावी. पिकास ताण पडल्यास व पाणी उपलब्ध असल्यास पिकाच्या संवेदनक्षम अवस्थेत पाणी द्यावे.

## सोयाबीन

- तांबेरा रोगाच्या नियंत्रणासाठी प्रोपिकोनॅझोल २५% ईसी / हेक्झाकोनॅझोल ५% ईसी १० मिली प्रती १० ली पाण्यातून फवारावे.
- करपा व पानांवरील ठिपके या रोगांच्या नियंत्रणासाठी रोगाचा प्रादुर्भाव दिसू लागताच कॉपर ऑक्झीक्लोराईड ५० डब्लू पी २५ ग्रॅम किंवा टेब्युकोनॅझोल १०%+ सल्फर ६५ % इब्लू जी २० ग्रॅम प्रती १० ली पाण्यातून फवारावे.

## रब्बी ज्वारी

- पहिला पंधरवाडा मुलस्थानी जलसंधारण करण्यासाठी ट्रॅक्टरचलित औजाराच्या सहाय्याने २X६ मीटर सारे पाडणे/बैलाच्या सहाय्याने १०X१० मी. अंतरावर बांध घालावेत. जास्त उतार असल्यास ५X५ मी.वर सारे पाडावे.

## फळबाग व्यवस्थापन

- **डाळिंब –** फळातील रस शोषणारे पतंग, तेलकट डाग रोग व बुरशीजन्य या रोगांचे नियंत्रण करावे.
- **सिताफळ–** पिठ्या ढेकुण नियंत्रणासाठी जैविक व निंबोळीयुक्त किडनाशकाचा वापर करावा, बुरशीजन्य रोगाचे नियंत्रण करावे.किडग्रस्त व रोगट फळे काढुन नष्ट करावीत.
- **बोर –** पाने खाणाऱ्या /केसाळ अळी भुंगेरे यांचे नियंत्रण करावे. मधमाशी संवर्धन करावे.
- **अंजीर –** अंजीर पिकावरील खोडकिड व सुत्रकृमीचे नियंत्रण करावे. खोडांना गेरू पेस्ट लावावी.
- **कागदी लिंबू –** पावसाचे जादा पाणी चराद्वारे बागेच्या बाहेर काढून द्यावे.
- सिल्ला, मावा व पाने पोखरणारी अळी : डायमिथोएट २० मिली अथवा इमिडाक्लोप्रीड २.५ मिली/१० लि. पाणी याप्रमाणे फवारणी करावी.
- **कँकर / खैऱ्या रोग** : कॉपर ऑक्सीक्लोराईड ३० ग्रॅम प्रति १० लि. पाणी. पेरूवरील फळमाशी नियंत्रणासाठी मिथाईल थुजेनॉलचे सापळे लावावीत.
- **पेरु –** देवी रोगाचे नियंत्रण करावे. त्यासाठी कार्बेनडेझिम ३%+ मॅनकोझेब ६३% डब्लुपी २ ग्रॅम प्रतिलिटर पाणी या प्रमाणात फवारावे.

## भाजीपाला व्यवस्थापन

- खरीप कांदा पिकाचे लागवडीसाठी रानबांधणी करावी.
- कांद्याची ७ ते ८ आठवड्याची रोपे लागवडीस वापरावी.
- लागवडीचे वेळेस कांदा रोपांची मुळे किडनाशक, बुरशीनाशक व जिवाणू खतांच्या द्रावणात बुडवावे.
- लागवडीचे वेळी खत मात्रेपैकी निम्मे नत्र, संपूर्ण स्फुरद व पालाश लागवडीचे वेळेस द्यावी.
- खरीप मिरची, वांगी, टोमॅटो, भेंडी, गवार, वेलवर्गीय भाजीपाला पिकांना खुरपणी करून नत्र खताचा पहिला हप्ता द्यावा.
- कीड व रोग नियंत्रणाचे उपाय करावेत.
- सतत ढगाळ वातावरण असल्यास ७ ते ८ दिवसांच्या अंतराने बुरशीनाशकाची फवारणी करावी.
- पिकामध्ये पाणी साचू देऊ नये.
- रांगडा कांदा लागवडीसाठी बियाणाची पेरणी करावी.

## आले

- वेळच्या वेळी येणारी तणे खुरपणी करून काढून टाकावीत.
- **उटाळणी करणे :** आले पीक २.५ ते ३ महिन्याचे असताना उटाळणी करावी. यामध्ये लांब दांड्याच्या खुरप्याने माती हलवली जाते. त्यामुळे मुळ्या तुटून त्याठिकाणी नवीन तंतुमय मुळे फूटतात. आले पिकास ६ व्या ते ७ व्या महिन्यात फुले येतात त्यास हुर्डे बांड असे म्हणतात. उटाळणी हुर्डे बांड येण्यापूर्वी करावी. हुर्डे बांड फुटल्यावर या पिकाच्या पानांची वाढ थांबून फण्याची वाढ होण्यास सुरुवात होते.
- उटाळणीनंतर पाण्याचा हलका ताण द्यावा म्हणजे फुटवे चांगले फुटतात.
- जमीन चुनखडयुक्त असेल तर पाने पिवळी पडलेली व शेंडा करपलेला दिसतो यावेळी मुळांना स्फुरद उपलब्ध होत नाही व त्यासाठी स्फुरद उपलब्ध करणारे जिवाणू खत एकरी २ किलो पाण्याद्वारे द्यावे.
- रिमझीम पावसात शाकीय वाढ चांगला जोर धरु लागते. अशावेळेस पिकास जास्त खाद्य अन्न लागते. त्याच्या वाढीचे बारकाईने निरीक्षण करुन नत्राचा दुसरा हप्ता ६० किलो नत्र द्यावे.
- हेक्टरी १.५ ते २.० टन करंजी किंवा निंबोळी पेंड द्यावी.
- **कंदकूज रोगापासून आले पिकाचे संरक्षण करावे.** आले पिकांवरील कंदकूज हा एक प्रमुख रोग आहे. वेळीच खबरदारी न घेतल्यास या रोगामुळे ५० टक्के पर्यंत नुकसान होऊ शकते. भरपूर पाऊस, भारी काळी कसदार, कमी निचरा असणारी जमीन या रोगास पोषक ठरते. हा रोग ऑगस्ट ते सप्टेंबर या कालावधीमध्ये जास्त प्रमाणात दिसून येतो. प्रथम पानांच्या शेंड्यावरून व कडांनी पिवळे पडून झाड खालीपर्यंत वाळले जाते. खोडलगतचा जमिनीलगतचा भाग काळपट राखी पडतो. याच ठिकाणी माती बाजूस करून पाहिल्यास गड्डाही वरून काळा पडलेला व निस्तेज झालेला दसतो. या भागावर दाब दिल्यास त्यातून कुजलेले, घाण वास येणारे पाणी बाहेर येते. अशा झाडाचे खोड थोडे जरी ओढले तरी चटकन हातात येते. हा रोग प्रामुख्याने सुत्रकृमी किंवा खुरपणी करताना, आंतरमशागत करताना कंदास इजा झाल्यास त्यातून पिथीयम फुयजेरियम यासारख्या बुरशींचा गड्डयामध्ये शिरकाव होऊन कंद कुजण्यास सुरुवात होते.
- या रोगाच्या नियंत्रणासाठी लागवड करताना निरोगी बियाण्याचा वापर करावा. जमीन हलकी ते मध्यम परंतु उत्तम निचऱ्याची निवडावी. पावसाळ्यात शेतामध्ये चर घेवून पाण्याचा निचरा करून यावा. तसेच मेटॅलॅक्सिल ८ टक्के + मॅन्कोझेब ६४ टक्के हे संयुक्त बुरशीनाशक २.५ ग्रॅम प्रति लिटर किंवा कार्बेन्डॉझिम (५० डब्ल्यु.पी.) १ ग्रॅम प्रति लिटर पाण्यात किंवा मॅन्कोझेब २.५ ग्रॅम प्रति लिटर यापैकी एका बुरशीनाशकाची आलटून पालटून फवारणी करावी. लागवडीच्या वेळी ट्रायकोडर्मा प्लस ५ किलो प्रति हेक्टरी शेणखतातून मिसळून घ्यावा.

## गायींमधील सामान्य आजारांचे आयुर्वेदिक उपचार

| आजार | औषधींचे नांव | साहित्य / कृती | उपचार |
|---|---|---|---|
| वारंवार उलटणे | कडीपत्ता पाने | २ मूठभर कडीपत्याची पाने | कृत्रिम रेतन झाल्या दिवसापासून - १० दिवस |
| वंध्यत्व | वांगी | पूर्ण पिकलेली वांगी एक किलो | दररोज - ७ दिवस |
| पान्हा न सोडणे | शतावरी | शतावरी पानांचा अर्क | दिवसातून दोनदा- ४ दिवस |
| दूध निर्मिती थांबणे | शतावरी | शतावरीची मुळे २५० ग्रॅम | दिवसातून दोनदा-४ दिवस |
| दुधातून रक्त येणे | लाजाळू | अर्धा ते एक किलो वनस्पतीचे लगदा (पेस्ट) करणे | दिवसातून दोनदा- ३ ते ४ दिवस |
| कासदाह | कोरफड | २ ते ३ पानांचा लगदा (पेस्ट) करणे | दूध काढल्यानंतर कासेवर दिवसा-तून दोनदा ४ ते ५ दिवस लावणे |
| मायांग बाहेर येणे | लाजाळू | २ मूठभर पाने बारीक करणे / अर्क काढणे | दिवसातून तीनदा पाजणे व अर्क मायांगावर ला-वणे-३ दिवस |
| जार अडकणे (वार न पडणे) | लाजाळू | १ किलो पाने | दिवसातून एकदा - २ दिवस |
| | बेल, काळी मिरी, लसूण व कांदा | मुठभर बेल-पाने, ६ लसूण पाकळ्या, १० काळी मिरी, २ कांदे यांची दुधात मिश्रण करून लगदा करणे | दिवसातून एकदा |
| बाह्य परोपजीवी कृमी | सिताफळ | बिया व पाने यांचा अर्क वनस्पती तेलात मिसळणे | दिवसातून दोनदा सर्व शरीरावर लावणे- ५ दिवस |
| | लिंब | लिंबोळी अर्क | शरीरावर लावणे |
| | सिताफळ, लिंब व तंबाखू पाने | सिताफळ बिया १ भाग + लिंबोणी १ भाग + तंबाखू पाने १/५ भाग यांचा लगदा करून २ लीटर पाण्यात भिजवणे | शरीरावर लावणे |

**औषधी वनस्पतींची अधिक माहिती जाणून घेण्यासाठी हा QR कोड स्कॅन करा**